## फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ३१३(१)(ब) अन्वये आरोपीचा जबाब

| | | |
|---|---|---|
| नाव | :- | शितल राहुल मोकाटे |
| वय | :- | वर्षे, ४२ |
| व्यवसाय | :- | शेती |
| राहणार | :- | ब्राम्हणी, ता.राहुरी, जि. अहमदनगर. |

| | | |
|---|---|---|
| प्रश्न क्र.१ | : | तुमच्याविरुध्द आलेल्या पुराव्याबाबत तुम्हाला खालील प्रश्न विचारण्यात येत असून त्याची उत्तरे देणे तुम्हास बंधनकारक नाही आणि प्रश्नांची खोटी उत्तरे दिल्यास तुमच्यावर कोणतीही कारवाई होणार नाही. परंतु प्रश्नाच्या उत्तरात आपल्या विरुध्द एखादी बाब आढळून आल्यास ती बाब पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात येईल. सदरची बाब तुम्हाला समजली आहे काय? |
| उत्तर | : | होय |
| प्रश्न क्र.२ | : | **अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदार क्र.१ रेवननाथ प्रसाद मोकाटे** यांच्या साक्षीत असे आले आहे की, तुम्ही त्यांचे भाऊबंदकी असल्यामुळे ते तुम्हाला ओळखतात. घटना दि.१७/०२/२०१५ रोजी ब्राम्हणी येथील गट क्र.१२ मध्ये सकाळी ९.०० वा. घडली, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे? |
| उत्तर | : | खोटे आहे. |
| प्रश्न क्र.३ | : | त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, तुम्ही त्यांचे मिळकतीच्या सामाईक बांधावर सायफन करीता बारव काढत होते त्यावेळी ते तुम्हाला बारव काढुन नका तुमच्या हद्दीत काढा असे सांगीतले असता तुम्ही त्यांना शिवीगाळ केली व तुम्ही आरोपी क्र.३ याने त्यांच्या डोक्यात पाईप हाणला, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे? |
| उत्तर | : | खोटे आहे. |
| प्रश्न क्र.४ | : | त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, परसराम मोकाटे हे तेथे भांडण सोडविण्यासाठी आले असता मयत आरोपी क्र.१ याने त्यांच्या डाव्या पायावर लोखंडी पाईपने मारले तुम्ही आरोपी क्र.४ व ५ यांनी त्यांना शिवीगाळ केली, त्यामुळे त्यांनी तुमच्याविरूध्द फिर्याद (नि.क्र.५२) दिली. तसेच तुम्ही ज्या हत्याराने मारहाण केली ते दोन लोखंडी पाईप व एक लोखंडी पट्टी व तुम्हाला न्यायालयात ओळखले, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे? |
| उत्तर | : | खोटे आहे. |
| प्रश्न क्र.६ | : | **अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदार क्र.२ विलास परशराम मोकाटे** यांच्या साक्षीत असे आले आहे की, ते व त्यांची पत्नी त्यांच्या शेतात खत घालीत असतांना तुम्ही तुमचे शेतात येऊन सामाईक बांधावर फ्रॅश |

| | | |
|---|---|---|
| | | व्हाल्व्ह काढला त्यावेळी त्यांचा मोठा भाऊ रेवणनाथ मोकाटे याने तुम्हाला तुमचे जमिनीत फॅलश व्हॉल्व्ह काढा, सामाईक बांधावर काढु नका असे सांगीतले असता तुम्ही त्यांना शिवीगाळ केली की,'तुम्हाला आम्ही आमचे शेतात येऊ देणार नाही, तुमचे हात पाय तोडून टाकु, मादरचोद' अशी शिवीगाळ केली, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे? |
| उत्तर | : | खोटे आहे. |
| प्रश्न क्र.७ | : | त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, तुम्ही आरोपी क्र.३ याने त्यांचे भावाच्या डोक्यात लोखंडी पाईपने मारले, त्यावेळेस त्यांचे वडील वाद सोडविण्यासाठी गेले असता त्यांना देखील तुम्ही आरोपी क्र.१ याने डाव्या पायाच्या गुडघ्याच्या खाली नळीवर मारहाण करून त्यांचा पाय मोडला, तसेच तुम्ही आरोपी क्र.४ ते ५ यांनी देखील शिवीगाळ केली, त्यानंतर ते वांबोरी पोलीस ठाण्यात गेले व त्यांच्या भावाने त्यांना फिर्याद दिली,तसेच तुम्ही ज्या हत्याराने मारहाण केली ते दोन लोखंडी पाईप व एक लोखंडी पट्टी व तुम्हाला न्यायालयात ओळखले, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे? |
| उत्तर | : | खोटे आहे. |
| प्रश्न क्र.८ | : | **अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदार क्र.३ संजय विठ्ठल मोकाटे** यांच्या साक्षीत असे आले आहे की, दि.१७/०२/२०२५ रोजी ते ब्राम्हणी गावातील संत मालिकामंदीर येथे पंचनाम्यासाठी गेले होते. त्या मंदीराच्या दोनशे फुट बाजुला दक्षिणेकडे मारामारी घटना झाली होती, घटनास्थळावर माती खुरदळलेली दिसली, पोलीसांनी त्यांच्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला (नि.क्र.५६), याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे? |
| उत्तर | : | खोटे आहे. |
| प्रश्न क्र.९ | : | **अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदार क्र.४ शेखर विठ्ठल मोकाटे** यांच्या साक्षीत असे आले आहे की, ते तुम्हाला ओळखतात, दि.१७/०२/२०२५ रोजी फिर्यादी व तुमच्यात शेतीच्या बांधावरून वाद झाला होता व मारामारी झाली होती, या मारामारीमध्ये त्यांचे चुलते परसराम मोकाटे यांचा डावा पाय मोडला, रेवन्नाथ यांचे डोक्याला मार लागला व उजव्या हातावर देखील जखम झाली होती त्यांनी तुम्ही आरोपी क्र.१ व ३ यांच्या हातात लोखंडी पाईप पाहिला होता व आरोपी क्र.२ यांचे हातात लोखंडी पट्टी तलवारीसारखी पाहिली होती, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे? |
| उत्तर | : | खोटे आहे. |
| प्रश्न क्र.१० | | त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, तुमच्या मारामारीचा आवाज ऐकल्यानंतर ते तेथे आले असता तुम्ही त्यांना 'जखमी लोकांना मदत करू नका' असे म्हणुन त्यांना देखील शिवीगाळ केली, त्यानंतर त्यांनी जखमींना |

| | | |
|---|---|---|
| | | वांबोरी येथील सरकारी दवाखान्यात नेले, त्यानंतर रेवन्नाथ यांनी तुमच्या विरूध्द फिर्याद दिली. पोलीसांनी त्यांचा जबाब नोंदविला, त्यांनी दोन लोखंडी पाईप व पट्टी न्यायालयात ओळखली, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे? |
| उत्तर | | खोटे आहे. |
| प्रश्न क्र.११ | | **अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदार क्र.६ विजय चंद्रभान मोकाटे** यांच्या साक्षीत असे आले आहे की, तुम्ही त्यांचे नातेवाईक असुन घटना दि.१७/०२/२०१५ रोजी सकाळी ९.०० वा. घडली, त्यावेळेस ते त्यांच्या शेतात होते, रेवणनाथ याने तुम्ही आरोपी क्र.१ यास सामाईक बांधावर बारे का काढले असे विचारले असता तुम्ही त्यांना शिवीगाळ करण्यास सुरूवात केली. तुम्ही आरोपी क्र.३ याने मोकाटे याने रेवणनाथ याच्या डोक्यावर लोखंडी पाईपने जखमी केले, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे? |
| उत्तर | | खोटे आहे. |
| प्रश्न क्र.१२ | | त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यानंतर तेथे त्यांचे चुलते परसराम मोकाटे आले असता तुम्ही आरोपी क्र.१ याने त्यांच्या चुलत्यांना लोखंडी पाईपने परसराम हयाचा डाव्या पायाच्या नडगीवर मारले. त्यामुळे त्यांचा पाय मोडला, तुम्ही आरोपी क्र.२ याने तलवारीसारख्या धारदार हत्याराने रेवन्नाथ परसराम मोकाटे याच्या उजव्या हाताच्या अंगठयाजवळ जखम केली. त्यानंतर त्यांनी जखमींना उपचारासाठी हॉस्पीटलला नेले, पोलीसांनी त्यांचा जबाब नोंदविला, तसेच तुम्ही ज्या हत्याराने मारहाण केली ते लोखंडी पाईप व धारदार हत्यारे व तुम्हाला न्यायालयात ओळखले, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे? |
| उत्तर | | खोटे आहे. |
| प्रश्न क्र.१३ | : | **अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदार क्र.७ श्रीधर विठोबा पालवे** यांच्या साक्षीत असे आले आहे की, दि.१७/०२/२०१५ रोजी सहाय्यक फौजदार म्हणुन राहुरी पोलीस स्टेशन अंतर्गत वांबोरी येथे काम करीत असतांना फिर्यादी रेवन्नाथ परसराम मोकाटे यांनी फिर्याद (निशाणी क्र.५२) दिली. त्यांनी जखमींना उपचारासाठी रिपोर्टसहीत (निशाणी क्र.८८) रूग्नालयात पाठविले. त्यानंतर राहुरी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.५९/२०१५ हा गुन्हा दाखल करण्यात आला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा (निशाणी क्र.५६) केला, वैदयकीय प्रमाणपत्र मिळण्याकामी पत्र व्यवहार (निशाणी क्र.८९) केला. जखमी परसराम मोकाटे यांचा जबाब नोंदविला, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे? |
| उत्तर | | खोटे आहे. |
| प्रश्न क्र.१४ | | त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यांनी गुन्हयात वापरलेल्या |

| | | |
|---|---|---|
| | | लोखंडी पाईपची जप्ती पंचनामा (निशाणी क्र.९०) केला. मुद्देमाल पावती (निशाणी क्र.९१) जमा केली. त्यानंतर तुम्हाला अटक केली. तुम्ही गुन्ह्यात वापरलेला मुद्देमाल लोखंडी पाईप व लोखंडी पट्टीचा जप्ती पंचनामा (निशाणी क्र.९२ व ९३) केला. त्याची मुद्देमाल पावती (निशाणी क्र.९४) जमा केली. तपासादरम्यान तुमच्याविरूध्द पुरेसा पुरावा मिळुन आल्याने त्यांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. त्यांनी तुम्हाला न्यायालयात ओळखले, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे? |
| उत्तर | : | खोटे आहे. |
| प्रश्न क्र.१५ | : | सरकारपक्षाचे साक्षीदार तुमच्या विरुध्द साक्ष का देतात? |
| उत्तर | : | आरोपी माझे भाऊबंद आहेत. आरोपीने माझ्याविरूध्द अनेक खोटया केसेस केलेल्या आहेत. |
| प्रश्न क्र.१६ | : | तुम्हाला शपथेवर जबाब दयावयाचा आहे का? |
| उत्तर | : | नाही. |
| प्रश्न क्र.१७ | : | तुम्हाला बचावाचा साक्षीदार तपासावयाचे आहेत काय? |
| उत्तर | : | नाही. |
| प्रश्न क्र.१८ | : | तुम्हाला या केसबाबत आणखी काही जादा सांगावयाचे आहे काय? |
| उत्तर | : | खोटी केस केली. |

आरोपीची सही

समक्ष
9-10-2025
**(पी.एच.पाटील)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(कोर्ट नं.२) राहुरी

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते आहे की, आरोपीचा जबाब हा माझ्यासमक्ष आणि माझ्या उपस्थितीत नोंदविण्यात आलेला असून तो आरोपीने केलेल्या विधानांप्रमाणे नोंदविण्यात आलेला आहे आणि तो खरा व बरोबर आहे.

दिनांक:

9-10-2025
**(पी.एच.पाटील)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(कोर्ट नं.२) राहुरी